महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक वाचनालयात माहिती व संदेशवहन तंत्रज्ञानाचा वापर : एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

पी. एच. डी (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) पदवीच्या नोंदणीकरीता सादर करावयाच्या प्रबंधाची

प्रारूप पत्रिका

आंतरविद्याशाखा

:: संशोधक ::

भालेराव संजीवनी बालाजी

(एम. लीब. सेट)

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. रामेश्वर एस. पवार

प्राचार्य

स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार कला महाविद्यालय,

पूर्णा, जि. परभणी

:: संशोधनकेंद्र ::

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड

सप्टेंबर २०२३

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरणांचे नावे	प्रष्ठ. क्रमांक
१.०	प्रकरण १ ले	
१.१	प्रस्तावना	०३
१.२	संशोधनाची उद्दिष्टे	०३
१.३	व्याप्ती व मर्यादा	०४
१.४	प्राथमिक अनुमान/ग्रहितके	०४
१.५	ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीने गरज	०४
१.६	पूर्वसाहित्याचा शोध	०५
१.७	संशोधन पध्दती	०५
१.८	माहिती संकलनाची तंत्रे	०५
१.९	माहिती संकलनाची साधने	०५
१.१०	पुढील प्रकरणांचा आढावा	०५

२.०	प्रकरण २ रे: पूर्वाभ्यासाचे समालोचन	०६

३.०	प्रकरण ३ रे : माहिती संकलन	०७
३.१	माहिती संकलन : प्रस्तावना	०७
३.२	संशोधन माहिती संकलनाचे साधन-प्रश्नावली आणि मुलाखत अनुसुची	०७
४.०	प्रकरण ४ थे : माहिती विश्लेषण	०७
५.०	प्रकरण ५ वे : समापन	०७
५.१	निष्कर्ष	०७
५.२	शिफारशी	०७
५.३	पुढील संशोधनास दिशा	०७
	संदर्भसूची	०७
	परिशिष्ट्ये	०७
	परिशिष्ठ अ : विद्यापीठाचे संमतीपत्र	
	परिशिष्ठ ब : प्रश्नावली नमुना (ग्रंथपालांसाठी)	
	परिशिष्ठ क : मुलाखत अनुसुची	
	परिशिष्ठ ड : निर्देश (ग्रंथपालांचे ग्रंथालयनिहाय पत्ते)	
	परिशिष्ठ इ: छायाचित्रे	
	परिशिष्ठ फ : नकाशा	

प्रकरण पहिले

महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक वाचनालयात माहिती व संदेशवहन तंत्रज्ञानाचा वापर : एक अभ्यास

१.१ प्रस्तावना

एखाद्या भौगोलिक परिसरातील ग्रंथालयांचा इतिहास व विकास माहिती करून घ्यावयाचा असेल तर त्या भौगोलिक परिसरातील लेखन, ग्रंथनिर्मिती व ग्रंथ उत्पादन यांचा इतिहास पहावा लागतो. ग्रंथालय या संस्थेचा पाया साक्षरतेशी निगडीत आहे. हा पाया सद्रढ झाल्या शिवाय ग्रंथालयाचा विकास होणार नाही. मानवी जीवनात ग्रंथालयाचे ,ग्रंथांचे अनन्यसाधारण स्थान असते. सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून वाचकांना जी साहित्य सेवा पुरविली जाते, त्यामुळे अभ्यासकांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात. समाजातील सर्वसामान्य अशा सर्व लोकांना वाचनसाहित्याच्या माध्यमातून मनोरंजन, माहिती आणि नवीन ज्ञान देण्यासाठी केलेली सार्वजनिक व्यवस्था म्हणजे सार्वजनिक ग्रंथालये होय. ग्रंथालये ज्ञानकेंद्रे तर आहेतच पण त्याचबरोबर संस्कार केंद्रेही आहेत. सार्वजनिक ग्रंथालये स्वशिक्षणाची लोकपिठे म्हणून उद्यास आली आहेत, तर ग्रंथपालाला माहिती शास्त्रज्ञ म्हणून संबोधले जाते.

सद्यस्थितीतील ग्रंथालयांची आवश्यकता व्यापक समाजजाग्रती व सुधारणेसाठी आहे. २१ व्या शतकामध्ये माहितीचा स्फोट झाला याला ज्ञानयुग म्हटले जाते. माहिती साक्षरतेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. माहिती तंत्रज्ञान प्रभुत्वामुळे संबंधित सर्वच तंत्रज्ञानाचा वापर संशोधनातील समस्यांच्या निराकरणासाठी केला जात आहे. पूर्वी समाजातील काही वर्गाचीच या ज्ञाननिर्मितीसाठी मक्तेदारी होती, दूरसंचार तंत्रज्ञानातील क्रांती आणि माहिती यांच्यामुळे ज्ञानाची दालने सर्वांसाठी उघडलेली आहेत.

यामुळे या शतकाला अपेक्षित असणारा ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी व त्याद्वारे आपल्या गावाचा, राज्याचा व राष्ट्राचा विकास साधण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची सबलता, सम्रध्दता च माहितीच्या गरजेची उपलब्धता त्याद्वारे सार्वजनिक ग्रंथालयांचा विविध पातळीवरील सर्वांगीण विकास या आवश्यक बाबी आहेत. सदरील संशोधन प्रबंधामध्ये "महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांचा सद्यस्थतीचा अभ्यास तसेच भविष्यकालीन वेध ही घेण्यात येणार आहे. तसेच ग्रंथालयाच्या आणि वाचकांच्या विकासाला कारणीभूत असणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१.२ संशोधनाची उद्दिष्टे:

१. महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांची माहिती घेणे.
२. महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांतील उपलब्ध माहिती तंत्रज्ञान साधनांचा परामर्श घेणे.
३. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाचा वापर जाणून घेणे.

४. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान विषयक वस्तुस्थिती अनुसरून भविष्यकालीन प्रगतीचा वेध घेणे.
५. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान विष्यक साहित्याची उपलब्धता वापर आणि वेध या संदर्भातील परिणामकारकता तपासणे.
६. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाच्या भविष्यकालीन परिपूर्णतेसंदर्भात उपाययोजना सुचविणे.

१.३ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

सदरील संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जाप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांपुरती असून शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ते २०२२-२३ अखेरपर्यंत मर्यादित असेल.

१.४ संशोधनाची ग्रहितके:

१. महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या पर्याप्त आहे.
२. महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांतील माहिती तंत्रज्ञानसाधनांचा आढावा घेण्यात येईल.
३. सदरील सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जातो अथवा नाही हे तपासणे.
४. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान विषयक वस्तुस्थिती अनुसरून भविष्यकालीन प्रगतीचा वेध घेणे शक्य आहे.
५. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञान साहित्याची उपलब्धता वापर आणि वेध या संदर्भातील परिणामकारकता दिसून येते का ते तपासणे.
६. सदरील सार्वजनिक ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाच्या भविष्यकालीन परिपूर्णते संदर्भात उपाययोजना सुचविता येतील.

१.५ ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीने गरज:

मानवाच्या विविध गरजा असतात. जीवन जगत असताना विविध स्वप्ने ही असतात, अशा स्वप्नांच्या पूर्ततेसाठी मानवला कठोर परिश्रम घेणे आवश्यक असते. त्यासाठी ज्ञान मिळवणे आवश्यक असते. ज्ञानाचे विविध स्त्रोत आढळून येतात, त्यापैकी सार्वजनिक ग्रंथालये ही महत्त्वाची केंद्रे आहेत. ग्रंथालयाद्वारे ज्ञान संप्रेषणाचा प्रसार होतो. ग्रंथालय हे विद्येचे मंदिर आणि ज्ञानाचे माहेरघर आहे. अज्ञानी माणसाला ज्ञानी करण्याचे सामर्थ्य ग्रंथालयांमध्ये असते. मानवी मनाला बौध्दक, मानसिक शक्ती देण्याचे कार्य करण्याची क्षमता सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये असते.दररोज प्रकाशत होणारी नवीन माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचवणे हे ग्रंथालयाचे आद्यकर्तव्य आहे. समाजाचे ज्ञान वाढविण्यासाठी, तसेच मनुष्याच्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील विविध विषयांवर संशोधन करणे गरजेचे आहे, जेणेकरून अभ्यासकांना/ संशोधकांना त्यांच्या संबंधित विषयात सखोल मार्गदर्शन मिळेल. ग्रंथालय क्षेत्राचा व्यापक दृष्टीने विचार केला असता ग्रंथपालन व्यवसायक्षेत्र कार्यप्रवण झाल्यास निरक्षरता दूर होण्यास व वाचनाची सवय लागून वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याचे कार्य सुलभरित्या पूर्ण करता येईल. ज्ञानाची क्षितिजे विस्तारण्यास मदत होऊन सार्वजनिक ग्रंथालयांचे जाळे निर्माण होऊन ते ग्रंथालयांच्या आणि सर्वसाधारण वाचकांच्या सर्वांगीण विकासाला उपयुक्त ठरेल.

१.६ पूर्वसाहित्याचा आढावा:

सदरील संशोधनाच्या प्रकरणांचे लिखाण करत असताना सार्वजनिक ग्रंथालयाशी संबंधित ग्रंथ, कालिके आणि इतर नियतकालिकांमधील लेख, सार्वजनिक ग्रंथालयांचे वार्षिक अहवाल, अंकेक्षण अहवाल संकेतस्थळे, आणि विषयाशी निगडीत असणारे प्रकल्प इत्यादि वाचनसाहित्याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१.७ संशोधन पध्दती:

सदरील संशोधनासाठी **वर्णनात्मक आणि ऐतिहासिक** संशोधन पध्दतींचा अवलंब करण्यात येणार आहे.

१.८ माहिती संकलनाची तंत्रे

सदरील संशोधनासाठी **पाहणी** हे माहिती संकलनाचे तंत्र वापरण्यात येणार आहे.

१.९ माहिती संकलनाची साधने

सदरील संशोधनासाठी **प्रश्नावली** आणि मुलाखत अनुसुची या माहिती संकलन साधनाचा उपयोग करण्यात येणार आहे.

१.१० पुढील प्रकरणांचा आढावा:

प्रकरण २ रे: सदरील शोध प्रबंधाच्या पुढील प्रकरण २ मध्ये पूर्वाभ्यासाचे समालोचन करित असताना सार्वजनिक ग्रंथालयांचा जागतिक ते स्थानिक पातळीपर्यंतचा आढावा घेण्यात येणार असून समालोचानामध्ये संशोधनासाठी अभ्यास केलेले संदर्भ जो की राजाराममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता आणि ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत अर्थसहाय्याच्या विविध योजनांची माहितीपुस्तिका यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे: या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील अ आणि ब दर्जा प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांना प्रश्नावली देउन आणि पाहणी करून भरून मिळालेल्या प्रश्नावलींच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे: या प्रकरणामध्ये माहिती विश्लेषण हे मिळालेल्या माहितीचे सार्वजनिक ग्रंथालयांच्या दर्जा वर्गनिहाय, तक्ता, स्तंभालेख, आणि वर्तुळालेख काढून त्याचे माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे: *या प्रकरणामध्ये समापन योग्य निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनास दिशा दाखवण्यात येणार आहेत.*

संदर्भ सूची मध्ये *शोध घेतलेल्या ग्रंथाची, नियतकालिकांची, संशोधन प्रकल्पांची आणि संकेतस्थळांची नोंद घेण्यात येणार आहे.*

परिशिष्ठांमध्ये *ग्रंथपालांसाठीचा प्रश्नावली नमुना, ग्रंथालयाचा पत्ता, छायाचित्रे, आणि नकाशा इत्यादि जोडण्यात येणार आहेत.*

संदर्भ सूची

अनु. क्रमांक	***ग्रंथ***
०१	*वीर ,धर्मराज(संपादक जाधव ,राम आणि पवार रामेश्वर) आधुनिक सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रश्न व उपाय , महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांचे विश्लेषणात्मक अध्ययन*
०२	*जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूर (राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता आणि ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्रराज्य अंतर्गत अर्थसहाय्याच्या विविध योजनांची माहिती पुस्तिका, २०१६*
०३	*जोशी , लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोश (प्रथमाव्रत्ती) खंड १५ : ग्रंथालयशास्त्र*
०४	*मराठे, ना. बा. भारतीय ग्रंथालयांचा इतिहास, मुंबई,१९७९*
०५	*डॉ. महाजन, शा. ग. ग्रंथालय कायदे, आदर्श सार्वजनिक ग्रंथालय कायदे, भारतातील विविध राज्यांमधील सार्वजनिक ग्रंथालय कायदे*

अनु. क्रमांक	*नियतकालिके*
०६	डॉ. पवार रामेश्वर सुर्यभानजी, *'महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीची अधोगती'* ग्रंथपरिवार, ऑगस्ट- सप्टेंबर, २०१६
०७	*अडसुळे,पांडुरंग. 'बदलत्या काळातील ग्रंथालय संकल्पना व आधुनिकीकरण' ग्रंथपरिवार, जून २०१७*
०८	डॉ. राजेंद्र कुंभार: राष्ट्रीय ज्ञान आयोगासंबंधी केलेल्या शिफारशी ज्ञानगंगोत्री सप्टे. आक्टो नोव्हे. २००७
०९	डॉ. राजेंद्र कुंभार : ग्रंथालय व माहितीशास्त्राची परिभाषा: सद्य:स्थिती आणि भविष्यवेध ज्ञानगंगोत्री जून-ऑगस्ट २०१८
१०	डॉ. राजेंद्र कुंभार : राष्ट्रीय ज्ञान आयोग आणि सार्वजनिक ग्रंथालये ज्ञानगंगोत्री सप्टे.- नोव्हे. २०१७

अ. क्र.	संकेतस्थळे
११	https://www.bytesofindia.com/newsdetails?NewsId=5168104801935389379
१२	http://odishaculture.gov.in/libraries_a.asp
१३	https://en.wikipedia.org/wiki/Open_access_in_India
१४	**https**://vishwakosh.marathi.gov.in/22593/
१५	https://vishwakosh.marathi.gov.in/41000/
१६	https://dol.maharashtra.gov.in/

संशोधक विद्यार्थी **संशोधन मार्गदर्शक**

भालेराव संजीवनी बालाजी **प्रा. डॉ. रामेश्वर सुर्यभानजी पवार**